# मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

दि. 39/ ७ /2023

// गोषवारा //

प्रकरण क्र. (963) :- निविदेस मान्यता देणेबाबत.

| अ. क्र. | टेंडर आय डी | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| १. | 891533_1 | गणेश देवल नगर शिमला गल्ली शौचालय बांधणे (स्वच्छ भारत अभियान)<br><br>मे.जैनम इंन्फ्राप्रोजेक्ट एल.एल.पी. | रू.1,15,15,048/-<br><br>4.5000% कमी दराने |

वरील प्रमाणे कमी दराच्या निविदांना मा.आयुक्त महोदय यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) अन्वये निविदा दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात वरील एक कामांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 73 (क) नुसार मान्यता देण्यास शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

PC7/DK/23-24/SG-3

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक ३१ जुलै 2023 रोजी स.११.३० वाजता.

विषय क्र. ( १८३ ) :- मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज निविदेस मान्यता देणेबाबत.

| अ. क्र. | टेंडर आय डी | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | 891533_1 | गणेश देवल नगर शिमला गल्ली शौचालय बांधणे (स्वच्छ भारत अभियान)<br><br>मे.जैनम इंन्फ्राप्रोजेक्ट एल.एल.पी. | रू.1,15,15,048/-<br><br>4.5000% कमी दराने |

## कार्यालयीन प्रस्तावना

वरील प्रमाणे कमी दराच्या निविदांना मा.आयुक्त महोदय यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) अन्वये निविदा दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात वरील विविध 01 कामाला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 73 (क) नुसार प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ९८३ दिनांक ३१/०१/२०२३**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध 01 कामाच्या निविदेस मान्यता देण्याच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा.महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन खालील कामाच्या कमी दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | टेंडर आय डी | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | 891533_1 | गणेश देवल नगर शिमला गल्ली शौचालय बांधणे (स्वच्छ भारत अभियान)<br><br>मे.जैनम इंन्फ्राप्रोजेक्ट एल.एल.पी. | रू.1,15,15,048/-<br><br>4.5000% कमी दराने |

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

PC-7/23-24/DK/ST-3

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // बांधकाम विभाग //

## // गोषवारा // दि. ३१/७/२०२३

**प्रकरण क्रमांक. ( ९८४ )** - मिराभाईंदर महानगरपालिका हद्दीतील सर्वधर्मीय उत्सवा अंतर्गत विविध ठिकाणी लाकडी तराफ्याची, बोटी, क्रेन, हायड्रा, फोर्क लिफ्ट इ. व्यवस्था करणे या कामाबाबत

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सर्वधर्मीय उत्सवासाठी महानगरपालिकेमार्फत विविध व्यवस्था करण्यात येते. शहरामध्ये गणपती, नवरात्री, दसरा, गणगौर उत्सव, माघी गणेश उत्सव, सरस्वती पूजा, साखर चतुर्थी, छत्रपूजा इ. उत्सवासाठी भाईंदर पूर्व व पश्चिम चौपाटी, शहरातील विविध तलाव, खाडी किनारी मूर्तीच्या विसर्जनासाठी व्यवस्था करण्यात येते.

सदर धार्मीक उत्सवाअंतर्गत विविध ठिकाणी लाकडी तराफ्याची, बोटी, क्रेन, हायड्रा, फोर्क लिफ्ट इ. व्यवस्था करणे कामी मे. कौशिक पाटील यांना संदर्भिय पत्रान्वये पुढील पाच वर्षासाठी (दि.01/08/2018 ते दि.31/07/2023) कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर कार्यादेशाप्रमाणे मंजूर केलेल्या दरामध्ये दरवर्षी 5% वाढ मंजूर केलेली असून सदर कार्यादेशाची मुदत दि.31/07/2023 संपुष्टात येत आहेत.

सदर कामी नव्याने निविदा मागविणे आवश्यक असून सदर कामासाठी सन 2023-24 या आर्थिक वर्षासाठी रु. 95 लक्ष इतका अपेक्षित आहे. विषयांकित कामासाठी सन 2023-24 या आर्थिक वर्षाच्या "सर्वधर्मिय उत्सव मंडप / लाईट व इतर व्यवस्था" या लेखाशिर्षकात तरतूद उपलब्ध आहे.

सबब सदर कामास पाच वर्ष मुदतीसाठी निविदा मागविणेसह या साठीच्या खर्चासाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेसाठी तसेच निविदा प्रक्रिया पूर्ण होवून कार्यादेश देईपर्यंत मंजूर ठेकेदाराकडून मंजूर दराने काम करून घेण्यासाठी प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता मिळण्यास शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-09/VP/2023-24/RP/MG-1

# <u>मिरा-भाईंदर महानगरपालिका</u>

**प्रशासकीय ठराव दिनांक ३१/ ७ / 2023 रोजी स.११.३० वाजता.**

**विषय क्र. (५८४) :-** मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

मिराभाईंदर महानगरपालिका हद्दीतील सर्वधर्मीय उत्सवा अंतर्गत विविध ठिकाणी लाकडी तराफ्याची, बोटी, क्रेन, हायड्रा, फोर्क लिफ्ट इ. व्यवस्था करणे या कामाबाबत

## कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सर्वधर्मीय उत्सवासाठी महानगरपालिकेमार्फत विविध व्यवस्था करण्यात येते. शहरामध्ये गणपती, नवरात्री, दसरा, गणगौर उत्सव, माघी गणेश उत्सव, सरस्वती पूजा, साखर चतुर्थी, छत्रपूजा इ. उत्सवासाठी भाईंदर पूर्व व पश्चिम चौपाटी, शहरातील विविध तलाव, खाडी किनारी मूर्तीच्या विसर्जनासाठी व्यवस्था करण्यात येते.

सदर धार्मीक उत्सवाअंतर्गत विविध ठिकाणी लाकडी तराफ्याची, बोटी, क्रेन, हायड्रा, फोर्क लिफ्ट इ. व्यवस्था करणे कामी मे. कौशिक पाटील यांना संदर्भिय पत्रान्वये पुढील पाच वर्षासाठी (दि.01/08/2018 ते दि.31/07/2023) कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर कार्यादेशाप्रमाणे मंजूर केलेल्या दरामध्ये दरवर्षी 5% वाढ मंजूर केलेली असून सदर कार्यादेशाची मुदत दि.31/07/2023 संपुष्टात येत आहेत.

सदर कामी नव्याने निविदा मागविणे आवश्यक असून सदर कामासाठी सन 2023-24 या आर्थिक वर्षासाठी रु. 95 लक्ष इतका अपेक्षित आहे. विषयांकित कामासाठी सन 2023-24 या आर्थिक वर्षाच्या "सर्वधर्मिय उत्सव मंडप / लाईट व इतर व्यवस्था" या लेखाशिर्षकात तरतूद उपलब्ध आहे.

सबब सदर कामास पाच वर्ष मुदतीसाठी निविदा मागविणेसह या साठीच्या खर्चासाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेसाठी तसेच निविदा प्रक्रिया पूर्ण होवून कार्यादेश देईपर्यंत मंजूर ठेकेदाराकडून मंजूर दराने काम करून घेण्यासाठी प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव आहे.

## <u>प्रशासकीय ठराव क्र. ५८४ दिनांक ३१/ ७ /2023</u>

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सर्वधर्मीय उत्सवासाठी महानगरपालिकेमार्फत विविध व्यवस्था करण्यात येते. शहरामध्ये गणपती, नवरात्री, दसरा, गणगौर उत्सव, माघी गणेश उत्सव, सरस्वती पूजा, साखर चतुर्थी, छत्रपूजा इ. उत्सवासाठी भाईंदर पूर्व व पश्चिम चौपाटी, शहरातील विविध तलाव, खाडी किनारी मूर्तीच्या विसर्जनासाठी व्यवस्था करण्यात येते.

सदर धार्मीक उत्सवाअंतर्गत विविध ठिकाणी लाकडी तराफ्याची, बोटी, क्रेन, हायड्रा, फोर्क लिफ्ट इ. व्यवस्था करणे कामी मे. कौशिक पाटील यांना संदर्भिय पत्रान्वये पुढील पाच वर्षासाठी (दि.01/08/2018 ते दि.31/07/2023) कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर कार्यादेशाप्रमाणे मंजूर केलेल्या दरामध्ये दरवर्षी 5% वाढ मंजूर केलेली असून सदर कार्यादेशाची मुदत दि.31/07/2023 संपुष्टात येत आहेत.

सदर कामी नव्याने निविदा मागविणे आवश्यक असून सदर कामासाठी सन 2023-24 या आर्थिक वर्षासाठी रु. 95 लक्ष इतका अपेक्षित आहे. विषयांकित कामासाठी सन 2023-24 या आर्थिक वर्षाच्या "सर्वधर्मिय उत्सव मंडप / लाईट व इतर व्यवस्था" या लेखाशिर्षकात तरतूद उपलब्ध आहे.

सबब सदर कामास पाच वर्ष मुदतीसाठी निविदा मागविणेसह या साठीच्या खर्चासाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेसाठी तसेच निविदा प्रक्रिया पूर्ण होवून कार्यादेश देईपर्यंत मंजूर ठेकेदाराकडून मंजूर दराने काम करून घेण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत : कलम 452 (अ) च्या (1 अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2) / नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी श्री.दिलीप ढोले, मिरा-भाईंदर महानगरपालिका, मा.महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन मान्यता देत आहे.

वरील कामाबाबत पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहीत पध्दीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
**प्रशासक तथा आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

PC-9/VP/2023-24/RP/MT - 01

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## परिवहन उपक्रम
### // गोषवारा // दि.31/07/2023

प्रकरण क्र.९८५ :- **मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या उपलब्ध 74 डिझेल बसेसकरीता "Selection of Operator for Operation and Maintenance of Buses, Bus Depot and/or Parking Space and providing Bus Service On PPP Basis (Gross Cost Contract Basis) कामी प्राप्त निविदा स्विकारणेस मंजुरी देणेबाबत. (Tender ID 2022_MBMC_857577_1)**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या 74 डिझेल बस चालविणेसाठी Gross Cost Contract (GCC) तत्वावर निविदा मागविणेसाठी प्रशासकीय ठराव क्र.14 दि.08/09/2022 अन्वये मंजूरी दिली आहे. सदर प्रकरणी श्री. भगवती तुगंनचंद शर्मा यांनी मा.उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका दाखल केली होती. सदर रिट याचिका क्र.13748/2022 (श्री. भगवती तुगंनचंद शर्मा विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर) अन्वये मा.उच्च न्यायालयाने दि.01/12/2022 रोजी आदेश पारीत केले असून शासनाने महाराष्ट्र अधिनियम कलम 451 नुसार कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेस सदरची निविदा प्रक्रिया सुरू ठेवता येईल, निविदा प्राप्त झाल्यानंतर तांत्रिक/ दराचे लिफाफे उघडून छाननी करता येईल, मात्र सदर प्रकरणी शासनाचा निर्णय होईपर्यंत कामाचा कार्यादेश देता येणार नाही. तसेच सदर प्रकरणी दि.06/12/2022 रोजी दोन्ही पक्षकार यांनी शासनाकडे हजर राहणेबाबत आदेशित केले होते. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने दि.06/12/2022 रोजी शासनाकडे समक्ष उपस्थित राहून शासनास अहवाल सादर केला होता.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या विषयांकीत कामाकरीता दि.04/10/2022 रोजी जाहिर निविदा सुचना दै.लोकमत, दै.नवशक्ती व दै.जन खुलासा या वृत्तपत्रात प्रसिध्द केली असता एकही निविदा प्राप्त झाली नव्हती. सदरकामी दि.04/11/2022 रोजी प्रथम मुदतवाढ देण्यात आली असता मुदतीत दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासाठी दि.18/11/2022 रोजी व्दितीय मुदतवाढ देण्यात आली असता मुदतीत दोनच निविदा प्राप्त झाल्या होत्या.

सबब, एक वेळा निविदा व दोन वेळा मुदतवाढ दिली असता पुरेसा प्रतिसाद मिळाला नसल्याने मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या उपलब्ध 74 डिझेल बसेसकरीता "Selection of Operator for Operation and Maintenance of Buses, Bus Depot and/or Parking Space and providing Bus Service On PPP Basis (Gross Cost Contract Basis) कामी दि.05/12/2022 रोजी फेर निविदा सुचना दै. लोकनायक दै. दि इकोनॉमिक्स टाईम्स व दै. जन खुलासा या वृत्तपत्रांत दि.07/12/2022 रोजी प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या होत्या व दि.21/12/2022 रोजी दि.04/01/2023 पर्यंत निविदा सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली होती.

त्यानुसार Tender ID 2022_MBMC_857577_1 अन्वये दि.04/01/2023 रोजी पर्यंत तीन निविदा प्राप्त झाल्या असून सदर निविदांचे मा.आयुक्त यांच्या मान्यतेने दि.05/01/2023 रोजी तांत्रिक लिफाफे उघडण्यात आले आहेत.

त्याअनुषंगाने निविदाधारक यांनी निविदेसोबत व तपशिलवार स्पष्टीकरणात्मक सादर केलेली कागदपत्रे तपासून नियुक्त सल्लागार M/s.Pike Learning Solution LLP (श्री.अंकुश पटेल) यांनी निविदाधारक यांनी निविदा अटी-शर्तीनुसार सादर केलेली कागदपत्रे छाननी करून दि.26/01/2023 रोजी Technical Evaluation Report सादर केला आहे. M/s.Pike Learning Solution LLP (श्री.अंकुश पटेल) यांच्या अहवालानुसार M/s.Shree Translink India Pvt.Ltd. व M/s.Mahalaxmi Krupa Infrastructure LLP हे निविदाधारक पात्र व M/s.Buthello Travels हे निविदाधारक अपात्र होत असून पात्र निविदाधारक यांचे दराचे लिफाफे (Financial Bid) उघडणेस मा.निविदा समितीने दि.01/02/2023 रोजी शिफारस केली असुन मा.आयुक्त यांनी दि.06/03/2023 रोजी मंजुरी दिली आहे.

उक्तप्रमाणे पात्र 02 निविदाधारक यांचे दराचे लिफाफे (Financial Bid) दि.09/03/2023 रोजी उघडण्यात आले आहेत. सदर निविदेमधील प्राप्त दरांचे Financial Evaluation करून नियुक्त सल्लागार M/s.Pike Learning Solution LLP (श्री.अंकुश पटेल) यांनी दि.17/05/2023 रोजी अहवाल सादर केला आहे. खालील तुलनात्मक तक्ता पाहता M/s.Mahalaxmi Krupa Infrastructure LLP यांची निविदा सर्वात कमी दराची (L1) आहे. सदर निविदाधारक यांना दर वाटाघाटीसाठी मा.निविदा समिती समक्ष बोलाविले असता, वाटाघाटीअंती खालीलप्रमाणे दर मान्य केले आहे.

| Sr.No. | Type of Buses | No. of Buses (A) | Quoted Rate in Rs. Per Km (B) (Without GST) | | **M/s.Mahalaxmi Krupa Infrastructure LLP यांनी वाटाघाटीअंती मान्य केलेले दर** |
|---|---|---|---|---|---|
| | | | M/s.Shree Translink India Pvt.Ltd. | **M/s.Mahalaxmi Krupa Infrastructure LLP** | |
| 1 | Fully built, 900mm Diesel Midi Non AC Buses | 10 | 98 | **67.51** | **65.00** |
| 2 | Fully built, 900mm Diesel Standard non AC Buses | 59 | 91 | **83.10** | **83.10** |
| 3 | Fully built, 400mm Diesel Premium segment AC Volvo Buses | 05 | 137 | **115.01** | **107.00** |
| | | | (L2) | **(L1)** | |

M/s.Mahalaxmi Krupa Infrastructure LLP यांनी वाटाघाटीअंती मान्य केलेले दर बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी असल्याने त्यांची निविदा स्विकारणेसाठी मा.निविदा समितीने दि.18/05/2023 रोजी शिफारस केली आहे.

उक्तप्रमाणे मा. उच्च न्यायालयाचे रिट याचिका क्र.13748/2022 मधील दि.01/12/2022 रोजीचे आदेशाच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया करून प्राप्त निविदांचे तांत्रिक व दराचे लिफाफे उघडून त्याची छाननी पूर्ण केलेली आहे. त्यामुळे सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाचे दि.01/12/2022 रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने शासनाचे पुढील आदेश मिळणेसाठी दि.19/06/2023 रोजी शासनास विनंती करण्यात आली होती. त्यानुसार **सदर प्रकरणी प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी दि.08/09/2022 रोजी पारीत केलेला ठराव क्र.14 च्या संदर्भात, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 451 नुसार विखंडनाची कार्यवाही करण्याची आवश्यकता नसल्याने, सदर ठरावानुसार पुढील आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करावी, असे शासनाकडील दि.25/07/2023 रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.**

मा. उच्च न्यायालयाच्या दि.01/12/2022 रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने शासनाने दि.25/07/2023 रोजी निर्णय कळविलेला असून, प्रशासकीय ठराव क्र.14 दि.08/09/2022 नुसार पुढील कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत. तसेच मा. उच्च न्यायालयाचे आदेशामधील परिच्छेद क्र.07 मध्ये शासनाने ठरावासंबंधी निर्णय घेतल्यानंतर पुढील कार्यवाही करावी असे आदेशित केलेले आहे. त्यानुसार विषयांकित निविदेसंबंधी पुढील कार्यवाही करता येईल.

सबब, 74 डिझेल बसकरीता Gross Cost Contract (GCC) तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त करणेकामी निविदा प्रक्रिया केली असून, सर्वात कमी दराची (L1), M/s.Mahalaxmi Krupa Infrastructure LLP यांची निविदा वाटाघाटी अंती मान्य केलेल्या दराने स्विकारणेस मा. निविदा समितीने शिफारस केली आहे.

तरी, मा. निविदा समितीच्या शिफारशीनुसार M/s.Mahalaxmi Krupa Infrastructure LLP यांची वाटाघाटी अंती मान्य केलेल्या दराने निविदा स्विकारणेस व करारनामा करून कार्यादेश देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(अनिकेत मानोरकर)
अति.आयुक्त तथा
परिवहन व्यवस्थापक
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त महोदय यांच्या मान्यतेने.)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# परिवहन उपक्रम
## प्रशासकीय ठराव दि.31/ 07 /2023

**प्रकरण क्र.9८५:- मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या उपलब्ध 74 डिझेल बसेसकरीता "Selection of Operator for Operation and Maintenance of Buses, Bus Depot and/or Parking Space and providing Bus Service On PPP Basis (Gross Cost Contract Basis) कामी प्राप्त निविदा स्विकारणेस मंजुरी देणेबाबत.**
**(Tender ID 2022_MBMC_857577_1)**

**ठराव क्र. 9८५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या 74 डिझेल बस चालविणेसाठी Gross Cost Contract (GCC) तत्वावर निविदा मागविणेसाठी प्रशासकीय ठराव क्र.14 दि.08/09/2022 अन्वये मंजूरी दिली आहे. सदर प्रकरणी श्री. भगवती तुगंनचंद शर्मा यांनी मा.उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका दाखल केली होती. सदर रिट याचिका क्र.13748/2022 (श्री. भगवती तुगंनचंद शर्मा विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर) अन्वये मा.उच्च न्यायालयाने दि.01/12/2022 रोजी आदेश पारीत केले असून शासनाने महाराष्ट्र अधिनियम कलम 451 नुसार कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेस सदरची निविदा प्रक्रिया सुरू ठेवता येईल, निविदा प्राप्त झाल्यानंतर तांत्रिक/ दराचे लिफाफे उघडून छाननी करता येईल, मात्र सदर प्रकरणी शासनाचा निर्णय होईपर्यंत कामाचा कार्यादेश देता येणार नाही. तसेच सदर प्रकरणी दि.06/12/2022 रोजी दोन्ही पक्षकार यांनी शासनाकडे हजर राहणेबाबत आदेशित केले होते. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने दि.06/12/2022 रोजी शासनाकडे समक्ष उपस्थित राहून शासनास अहवाल सादर केला होता.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या विषयांकीत कामाकरीता दि.04/10/2022 रोजी जाहिर निविदा सुचना दै.लोकमत, दै.नवशक्ती व दै.जन खुलासा या वृत्तपत्रात प्रसिध्द केली असता एकही निविदा प्राप्त झाली नव्हती. सदरकामी दि.04/11/2022 रोजी प्रथम मुदतवाढ देण्यात आली असता मुदतील दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासाठी दि.18/11/2022 रोजी व्दितीय मुदतवाढ देण्यात आली असता मुदतीत दोनच निविदा प्राप्त झाल्या होत्या.

सबब, एक वेळा निविदा व दोन वेळा मुदतवाढ दिली असता पुरेसा प्रतिसाद मिळाला नसल्याने मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या उपलब्ध 74 डिझेल बसेसकरीता "Selection of Operator for Operation and Maintenance of Buses, Bus Depot and/or Parking Space and providing Bus Service On PPP Basis (Gross Cost Contract Basis) कामी दि.05/12/2022 रोजी फेर निविदा सुचना दै. लोकनायक दै. दि इकोनॉमिक्स टाईम्स व दै. जन खुलासा या वृत्तपत्रांत दि.07/12/2022 रोजी प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या होत्या व दि.21/12/2022 रोजी दि.04/01/2023 पर्यंत निविदा सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानुसार Tender ID 2022_MBMC_857577_1 अन्वये दि.04/01/2023 रोजी

पर्यंत तीन निविदा प्राप्त झाल्या असून सदर निविदांचे मा.आयुक्त यांच्या मान्यतेने दि.05/01/2023 रोजी तांत्रिक लिफाफे उघडण्यात आले आहेत.

त्याअनुषंगाने निविदाधारक यांनी निविदेसोबत व तपशिलवार स्पष्टीकरणात्मक सादर केलेली कागदपत्रे तपासून नियुक्त सल्लागार M/s.Pike Learning Solution LLP (श्री.अंकुश पटेल) यांनी निविदाधारक यांनी निविदा अटी-शर्तीनुसार सादर केलेली कागदपत्रे छाननी करून दि.26/01/2023 रोजी Technical Evaluation Report सादर केला आहे. M/s.Pike Learning Solution LLP (श्री.अंकुश पटेल) यांच्या अहवालानुसार M/s.Shree Translink India Pvt.Ltd. व M/s.Mahalaxmi Krupa Infrastructure LLP हे निविदाधारक पात्र व M/s.Buthello Travels हे निविदाधारक अपात्र होत असून पात्र निविदाधारक यांचे दराचे लिफाफे (Financial Bid) उघडणेस मा.निविदा समितीने दि.01/02/2023 रोजी शिफारस केली असुन मा.आयुक्त यांनी दि.06/03/2023 रोजी मंजुरी दिली आहे.

उक्तप्रमाणे पात्र 02 निविदाधारक यांचे दराचे लिफाफे (Financial Bid) दि.09/03/2023 रोजी उघडण्यात आले आहेत. सदर निविदेमधील प्राप्त दरांचे Financial Evaluation करून नियुक्त सल्लागार M/s.Pike Learning Solution LLP (श्री.अंकुश पटेल) यांनी दि.17/05/2023 रोजी अहवाल सादर केला आहे. खालील तुलनात्मक तक्ता पाहता M/s.Mahalaxmi Krupa Infrastructure LLP यांची निविदा सर्वात कमी दराची (L1) आहे. सदर निविदाधारक यांना दर वाटाघाटीसाठी मा.निविदा समिती समक्ष बोलाविले असता, वाटाघाटीअंती खालीलप्रमाणे दर मान्य केले आहे.

| Sr. No. | Type of Buses | No. of Buses (A) | Quoted Rate in Rs. Per Km (B) (Without GST) | | **M/s.Mahalaxmi Krupa Infrastructure LLP यांनी वाटाघाटीअंती मान्य केलेले दर** |
|---|---|---|---|---|---|
| | | | M/s.Shree Translink India Pvt.Ltd. | **M/s.Mahalaxmi Krupa Infrastructure LLP** | |
| 1 | Fully built, 900mm Diesel Midi Non AC Buses | 10 | 98 | **67.51** | **65.00** |
| 2 | Fully built, 900mm Diesel Standard non AC Buses | 59 | 91 | **83.10** | **83.10** |
| 3 | Fully built, 400mm Diesel Premium segment AC Volvo Buses | 05 | 137 | **115.01** | **107.00** |
| | | | (L2) | **(L1)** | |

सबब, M/s.Mahalaxmi Krupa Infrastructure LLP यांनी वाटाघाटीअंती मान्य केलेले दर बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी असल्याने त्यांची निविदा स्विकारणेसाठी मा.निविदा समितीने दि.18/05/2023 रोजी शिफारस केली आहे.

उक्तप्रमाणे मा. उच्च न्यायालयाचे रिट याचिका क्र.13748/2022 मधील दि.01/12/2022 रोजीचे आदेशाच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया करून प्राप्त निविदांचे तांत्रिक व दराचे लिफाफे उघडून त्याची छाननी पूर्ण केलेली आहे. त्यामुळे सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाचे दि.01/12/2022 रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने शासनाचे पुढील आदेश मिळणेसाठी दि.19/06/2023 रोजी शासनास विनंती करण्यात आली होती. त्यानुसार **सदर प्रकरणी प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी दि.08/09/2022 रोजी पारीत केलेला ठराव क्र.14 च्या संदर्भात, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 451 नुसार विखंडनाची कार्यवाही करण्याची आवश्यकता नसल्याने, सदर ठरावानुसार पुढील आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करावी, असे शासनाकडील दि.25/07/2023 रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.**

मा. उच्च न्यायालयाच्या दि.01/12/2022 रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने शासनाने दि.25/07/2023 रोजी निर्णय कळविलेला असून, प्रशासकीय ठराव क्र.14 दि.08/09/2022 नुसार पुढील कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत. तसेच या संदर्भात मा. विधी अधिकारी यांनी, शासनाने दि.25/07/2023 रोजीच्या पत्रान्वये दि.08/09/2022 च्या प्रशायकीय ठराव क्र.14 बाबत निर्णय कळविला असल्याने, दि.08/09/202 रोजीच्या प्रशासक यांनी केलेल्या ठरावानुसार व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यादेश देणेबाबत पुढील कार्यवाही करावी, असे अभिप्राय दिले आहेत.

सबब, 74 डिझेल बसकरीता Gross Cost Contract (GCC) तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त करणेकामी निविदा प्रक्रिया केली असून, सर्वात कमी दराची (L1), M/s.Mahalaxmi Krupa Infrastructure LLP यांची निविदा वाटाघाटी अंती मान्य केलेल्या दराने स्विकारणेस मा. निविदा समितीने शिफारस केली असुन मा. आयुक्त यांनी दि.27/07/2023 रोजी मंजूरी दिली आहे.

तरी, उक्तप्रमाणे मा. उच्च न्यायालयाकडील दि.01/12/2022 रोजीचे आदेश, शासनाकडील दि.25/07/2023 रोजीचा निर्णय व मा. विधी अधिकारो यांचे दि.26/07/2023 रोजीचे अभिप्राय विचारात घेता, M/s.Mahalaxmi Krupa Infrastructure LLP यांची वाटाघाटी अंती मान्य केलेल्या दराने निविदा स्विकारणेस व करारनामा करून कार्यादेश देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## // मालमत्ता व्यवस्थापन विभाग //

## // गोषवारा // दि. ३१/७/२०२३

**प्रकरण क्र. (७८६) :-** मिरारोड (पूर्व) धम्म सम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर इमारती मधील सभागृह योग प्रशिक्षणासाठी देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) धम्म सम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर इमारती मधील सभागृह वापराबाबत मा. प्रशासकीय ठराव क्र.105 दि.04/11/2022 अन्वये धोरण निश्चित केले आहे. सदर धोरणात योगा प्रशिक्षणासाठी महानगरपालिकेमार्फत प्रशिक्षक नेमून प्रशिक्षणाच्या वेळा निश्चित करण्यात आल्या होत्या, तथापी सदर प्रशिक्षक महानगरपालिकेमार्फत न नेमता खाजगी योगा क्लासेसना सदर सभागृहात योगा क्लासेस चालविणेसाठी जागा उपलब्ध करून दिल्यास त्यांचेमार्फत प्रशिक्षक नेमून सदर क्लासेस चालविण्यात येतील. यासाठी खालीलप्रमाणे धोरण ठरविणे आवश्यक आहे.

1) सदर सभागृहातील जागा योग प्रशिक्षणासाठी सोमवार ते शुक्रवार पर्यंत दररोज सकाळी 7 ते 9 व संध्याकाळी 4 ते 7 या वेळेत देण्यात येईल.
2) महानगरपालिकेमार्फत सदर सभागृह इतर कार्यक्रमासाठी आरक्षित असल्यास योग प्रशिक्षणाच्या वेळेत बदल करावा लागेल.
3) सदर योग प्रशिक्षणासाठी प्रथमत: 3 वर्ष मुदतीसाठी क्लासेस चालविण्याचा अनुभव असणाऱ्या संस्थेची नेमणूक करावी.
4) प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस प्रशिक्षणार्थी कडून फी ठरवून घेण्याची मूभा राहील.
5) सदर ठिकाणी कमीत कमी 50 प्रशिक्षणार्थींना (पुरूष व स्त्रीया) योगाचे प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील.
6) मासिक भाडे व्यतिरिक्त इतर कोणतेही चार्जेस महानगरपालिकेमार्फत आकारण्यात येणार नाहीत, तथापी तोड-फोड अथवा नुकसान केल्यास त्याची भरपाई संस्थेस करून द्यावी लागेल.
7) सभागृह व्यतिरिक्त कोणतीही जागा योग प्रशिक्षणासाठी वापरण्यास देण्यात येणार नाही. तसेच सभागृहात इतर कोणतेही साहीत्य, सुविधा उपलब्ध करून दिले जाणार नाही.
8) प्रशिक्षणार्थींची यादी व प्रशिक्षकाचे नाव, पत्ता व सर्व माहिती व्यवस्थापक, सभागृह यांचेकडे दर महिन्यास देणे बंधनकारक राहील.

मा. प्रशासकीय ठराव क्र.105 दि.04/11/2022 मधील धोरणात अंशत: बदल करून व वरील प्रमाणे अटीशर्ती निश्चित करून सभागृह योग प्रशिक्षणासाठी देणेची कार्यवाही करणेसाठी प्रशासकीय ठरावाव्दारे धोरण निश्चित होणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
**शहर अभियंता**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-05/DK/23-24/MG-2

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

// मालमत्ता व्यवस्थापन विभाग //

प्रशासकीय ठराव दिनांक ३१/७/ 2023 रोजी दु. ११.३० वाजता.

**विषय क्र. (१८६ ) :-** मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

मिरारोड (पूर्व) धम्म सम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर इमारती मधील सभागृह योग प्रशिक्षणासाठी देणे.

## कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) धम्म सम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर इमारती मधील सभागृह वापराबाबत मा. प्रशासकीय ठराव क्र.105 दि.04/11/2022 अन्वये धोरण निश्चित केले आहे. सदर धोरणात योगा प्रशिक्षणासाठी महानगरपालिकेमार्फत प्रशिक्षक नेमून प्रशिक्षणाच्या वेळा निश्चित करण्यात आल्या होत्या, तथापी सदर प्रशिक्षक महानगरपालिकेमार्फत न नेमता खाजगी योगा क्लासेसना सदर सभागृहात योगा क्लासेस चालविणेसाठी जागा उपलब्ध करून दिल्यास त्यांचेमार्फत प्रशिक्षक नेमून सदर क्लासेस चालविण्यात येतील. यासाठी खालीलप्रमाणे धोरण ठरविणे आवश्यक आहे.

1) सदर सभागृहातील जागा योग प्रशिक्षणासाठी सोमवार ते शुक्रवार पर्यंत दररोज सकाळी 7 ते 9 व संध्याकाळी 4 ते 7 या वेळेत देण्यात येईल.

2) महानगरपालिकेमार्फत सदर सभागृह इतर कार्यक्रमासाठी आरक्षित असल्यास योग प्रशिक्षणाच्या वेळेत बदल करण्यात येईल.

3) सदर योग प्रशिक्षणासाठी प्रथमतः 3 वर्ष मुदतीसाठी क्लासेस चालविण्याचा अनुभव असणाऱ्या संस्थेची नेमणूक करण्यात यावी.

4) प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस प्रशिक्षणार्थी कडून फी ठरवून घेण्याची मूभा राहील.

5) सदर ठिकाणी कमीत कमी 50 प्रशिक्षणार्थींना (पुरुष व स्त्रीया) योगाचे प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील.

6) मासिक भाडे व्यतिरिक्त इतर कोणतेही चार्जेस महानगरपालिकेमार्फत आकारण्यात येणार नाहीत, तथापी तोड-फोड अथवा नुकसान केल्यास त्याची भरपाई संस्थेस करून द्यावी लागेल.

7) सभागृह व्यतिरिक्त कोणतीही जागा योग प्रशिक्षणासाठी वापरण्यास देण्यात येणार नाही. तसेच सभागृहात इतर कोणतेही साहीत्य, सुविधा उपलब्ध करून दिले जाणार नाही.

8) प्रशिक्षणार्थींची यादी व प्रशिक्षकाचे नाव, पत्ता व सर्व माहिती व्यवस्थापक, सभागृह यांचेकडे दर महिन्यास देणे बंधनकारक राहील.

वरील प्रमाणे मा. प्रशासकीय ठराव क्र.105 दि.04/11/2022 मधील धोरणात अंशतः बदल करून योग प्रशिक्षणाबाबत धोरण निश्चित करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**<u>प्रशासकीय ठराव क्र. ९८६ दिनांक ३१/ ७ /2023</u>**

वरील प्रमाणे प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषतः कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2) /नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या मिरारोड (पूर्व) धम्म सम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर इमारती मधील सभागृह योग प्रशिक्षणासाठी वापरणेस वरील प्रस्तावति धोरणास मान्यता देत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(दिलीप ढोले)
**प्रशासक तथा आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत - मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**